ISSN: 2348-3083
SJIF 2016 : 4.44
UGC APPROVED SR. NO. 48612
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE
SRJIS

# इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक-आर्थिक स्तर यातील सहसंबंधांचा अभ्यास

**हिरणवाळे स्नेहल रामनाथ**

*विद्यावाचस्पती (पीएच.डी.) विद्यार्थी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे*

**Abstract**

*बालक आनुवंशिक गुण घेऊन जन्माला येते. या गुणांचा उच्चतम मर्यादेपर्यंत विकास होण्यासाठी अनुकूल परिस्थिती प्राप्त होणे गरजेचे असते. बाल्यावस्थेत कौटुंबिक परिस्थितीचा बालकाच्या विकासावर परिणाम होतो. बाल्यावस्थेत बालकाच्या सामाजिकीकरणास, त्याच्या सामाजिक विकासास सुरूवात होते. 'उत्तर बाल्यावस्था' हा विकासाचा टप्पा बालकाच्या सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतो. त्यामुळेच 'उत्तर बाल्यावस्थेतील' विद्यार्थ्यांच्या सामाजिक बुध्द्यांकावर त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक-आर्थिक स्तराचा काही परिणाम होतो का? हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्यात आले होते. बालकाच्या सामाजिक बुध्द्यांकावर त्याच्या कुटुंबाच्या सामाजिक-आर्थिक स्तराचा परिणाम होतो हे प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षातून दिसून येते.*

***महत्त्वाच्या संज्ञा :*** *बाल्यवस्था, सामाजिक विकास, सामाजिक बुध्द्यांक, कुटुंबाचा सामाजिक-आर्थिक स्तर*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

- **प्रस्तावना :**

प्रत्येक बालक काही गुणवैशिष्ट्ये घेऊन जन्माला येतो. या उपजत गुणवैशिष्ट्यांना 'अनुवंश' म्हणतात. या आनुवांशिक गुणांचा उच्च मर्यादेपर्यंत विकास होण्यासाठी अनुकूल परिस्थिती प्राप्त व्हावी लागते.

बालकाचा जन्म झाल्याबरोबर तो 'कुटुंब' या सामाजिक संस्थेत प्रवेश करतो. कौटुंबिक वातावरणाचा बालकाच्या भावनिक, नैतिक व सामाजिक विकासावर प्रभाव पडतो. कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती, कुटुंबाचा दर्जा, संस्कृती, पालकांचे शिक्षण, व्यवसाय या सर्वांचा अनुकूल वा प्रतिकूल परिणाम बालकाच्या विकासावर होत असतो. बालकाचा सामाजिक-आर्थिक स्तर बालकाच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम करतो.

**विलरमॅन (Willerman) यांच्या मते,**

''कुटुंबाचा सामाजिक दर्जा, पालकांची शैक्षणिक पातळी जोपसनेची गुणवत्ता, मात्यापित्याचे प्रेम व स्विकृती ह्या सर्वांचा बालकाच्या विकासक्रमावर प्रभाव पडतो.''

**तर काल्टेल (Cattell) यांच्या मते,**

''बालक आपल्या सामाजिक-आर्थिक स्तराला अनुसरून आपले सामाजिक वर्तन, सामाजिक परिस्थितीला अनुसरून समायोजन व सामाजिक प्रभाव ठरवतो.''

बालकाच्या विकासावस्थांपैकी उत्तर बाल्यावस्था / किशोरावस्था (९ ते १२ वर्षे) या कालखंडात बालकाचा सामाजिक विकास होण्यास, त्याचे सामाजिकीकरण होण्यास सुरूवात होते. बालकाच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण ही

त्याच्या किशोरावस्थेतील / बाल्यावस्थेतील विकासावर अवलंबून असते. त्यामुळेच उत्तर बाल्यावस्थेतील बालकांच्या सामाजिक विकासावर त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक–आर्थिक स्तराचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे हा प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे.

- **संशोधन समस्या विधान :**

''पुणे शहरातील इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधांचा अभ्यास करणे.''

- **संशोधनाची उद्दिष्टे :**

१) पुणे शहरातील इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक तपासणे.

२) पुणे शहरातील इ. ७ वी च्या विद्यार्थ्याचा सामाजिक–आर्थिक स्तर निश्चित करणे.

३) इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

- **संशोधन पध्दती :**

➢ **जनसंख्या :** पुणे शहरातील इ. ७ वी च्या वर्गातील विद्यार्थी.

➢ **न्यादर्श :** पुणे मनपा शिक्षण मंडळ संचलित शाळा व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील मराठी व इंग्रजी माध्यमातील एकूण २४ शाळांमधून इ. ७ वी च्या वर्गात शिक्षण घेणारे ९५० विद्यार्थी.

➢ **न्यादर्शन पध्दती :** स्तरीत यादृच्छिक नमूना निवड

➢ **माहिती संकलन साधन :**

१. विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक तपासण्यासाठी ज्ञानप्रबोधिनी संस्था, पुणे निर्मीत,

a) C.B.U. = Cognition of Behaviourial Unit Test

b) N.B.C. = Convergent Production of Behaviourial Classes Test.

२) बालकाचा सामाजिक–आर्थिक स्तर निश्चित करण्यासाठी एल.एन.दुबे व बी. निकम निर्मित **सामाजिक–आर्थिक स्तर प्रश्नावली**

यांचा वापर केला.

➢ **संशोधन पध्दती :** सर्वेक्षण पध्दती

➢ **संख्याशास्त्रीय साधने :** सहसंबंधगुणक

➢ **संशोधन कार्यपध्दती :**

- बालकांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांच्या कुटुंबाचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंध अभ्यासण्यासाठी संशोधिकेने सर्वप्रथम पुणे मनपा शिक्षणमंडळ व खाजगी व्यवस्थापन संचलित मराठी व

इंग्रजी माध्यमांच्या २४ शाळांमधील ९५० विद्यार्थ्यांकडून सामाजिक बुध्द्यांक चाचण्या (C.B.U व N.B.C.) सोडवून घेतल्या.

- बालकांच्या कुटुंबाचा सामाजिक–आर्थिक स्तर निश्चित करण्यासाठी 'सामाजिक–आर्थिक स्तर प्रश्नावली' सोडवून घेतली.
- बालकांचा सामाजिक बुध्द्यांक व त्याचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील परस्परसंबंध शोधण्यासाठी 'सहसंबंधगुणक' या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आला.

- **निष्कर्ष :**

१) न्यादर्शातील सर्व विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांच्या कुटुंबाचा सामाजिक आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक ०.३४९ आहे. हा कमी पण धन सहसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

२) मनपा संचलित शाळांतील विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक .१९९ आहे. हा दुर्लक्ष करण्याइतका म्हणजेच अल्प पण धन सहसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

३) खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांतील विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक ०.३५१ आहे. हा बरा पण धन सहसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

४) न्यादर्शातील सर्व मुलींचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक ०.४२६ आहे. हा मध्यम पण धन सहसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

५) न्यादर्शातील सर्व मुलांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक ०.३०३ आहे. हा बरा पण धन सहसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

६) न्यादर्शातील मराठी माध्यमातील सर्व विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक ०.३३६ आहे. हा बरा व धनसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

७) न्यादर्शातील इंग्रजी माध्यमातील सर्व विद्यार्थ्यांचा सामाजिक बुध्द्यांक व त्यांचा सामाजिक–आर्थिक स्तर यातील सहसंबंधगुणक ०.२३८ हा बरा व धन सहसंबंध आहे. हा सहसंबंध ०.०१ स्तरावर सार्थ आहे.

- **ऊहापोह :**

वरील संख्याशास्त्रीय विश्लेषणावरून असे दिसून येते की, बालकाच्या सामाजिक बुध्दिमत्ता विकासावर त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक–आर्थिक स्तराचा परिणाम होतो. पालकांचे उत्पन्न, पालकांचे शिक्षण, समाजातील स्थान व मान, हक्क व अधिकार, संस्कृती, राहणीमानाचा दर्जा हे सर्व घटक बालकांच्या सामाजिक विकासाला प्रभावित करतात. त्यामुळे निम्न सामाजिक–आर्थिक स्तरातून येणाऱ्या बालकांच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. हा न्यूनगंड दूर करून बालकांना मुख्य सामाजिक प्रवाहात त्यांना आणणे गरजेचे आहे.

- **संदर्भ :**

*Goleman, Daniel. (2006) Social Intelligence, Hutchninson, London.*
*Erikson, Erik. H. (1950) Childhood & Society, W. W. Norton and company, New York.*
*Jnana Prabodhini's Institute of Psychology, A Handbook for Administering Psychological Tests, Pune – 30.*
*Jnana Prabodhini's Institute of Psychology, A Handbook for Psychological Testing, Pune – 30.*
*Dubey, L. N., & Nikam, B. (2005) Manual Socio – Economic Status Scale (Urban), Distributor, Arohi Manavigyan Kendra, Jabalpur.*